# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U/175 / 2009 / 09 / Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect of Dr.Bhagwatrao K. Karad, Banjara Hills, Satara, Beed-Bypass Road, Aurangabad.(Consumer No. 490011536759)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Dr.Bhagwatrao K.Karad Banjara Hills, Satara, Beed-Bypass Road, Aurangabad.**

**The consumer has requested the Forum to pass Interim order for reconnection of the supply.**

**The hearing on passing of Interim Order will be held on Tuesday 27^h Jan.09 at 13.00 Hours.**

**You are requested to submit your reply at the time of hearing.**

**Encl: As above**

**Copy to**
**Dr.Bhagwatrao K.Karad**
**Banjara Hills, Satara, Beed-Bypass Road,**
**Aurangabad.**

# BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM AURANGABAD ZONE, AURANGABAD

**( Case No. CGRF / AZ /AUR /U / 175 / 2008 / 09 ).**

**Dr.Bhagwatrao K.Karad,**
Banjara Hills, Satara, Beed-Bypass Road,
Aurangabad.
( Consumer No. 490011536759)

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle,Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 27.01.2009**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed his grievance in the Forum regarding wrong bills issued by the Distribution Licensee and also requested the Forum to pass an interim order directing the Distribution Licensee to reconnect his electricity supply of his residence which has been disconnected on account of wrong bills issued by the D.L..

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission The hearing on the application of the consumer for passing interim order was kept on 27.01.09.

On the date of hearing, i.e. on , consumer representative Dr.Bhagwatrao K.Karad, and Nodal Officer of Distribution Licensee Shri Rathore were present. On hearing both the parties and by going through the CPL of the consumer that there was no dispute between the parties for the bills issued till Jan.07. The amount due from consumer till Jan.07 was Rs.8757=15. The bills from the month of Feb 07 onwards are disputed by the consumer.

Cont:

Since the Nodal officer could not file any reply / documents on the grievance of the consumer, the Forum , in the interest of justice and as per provision No.6.5, of the Regulation 2006, hereby direct the D.L. to reconnect the electricity supply of the consumer on receipt of Rs. 8500/ from the consumer complainant. The supply shall be reconnected within 24 hrs from the date of receipt of payment. Next hearing in this matter is kept on 03.02.09 at 12.00hrs.

| | | |
|---|---|---|
| **( H.A.Kapadia)** | **( P.A.Sagane)** | **(V.A.Hambire)** |
| **Member** | **Member Secretary** | **Chairman** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७५/२००९/०९**

**तक्रार दाखल दिनांक ;- २३/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- २१/०३/२००९**

**श्री भागवत कराड,**
**बंजाराहिल्स,बीड बाय पास रोड,**
**सातारा औरंगाबाद.**
**( ग्राहक ४९००११५३६७५९ ) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २३/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचा सांराश खालील प्रमाणे.

१) अर्जदार यांनी गट क्रमांक ११५, सातारा औरंगाबाद येथील मालमत्ता भागवत लक्ष्मण चव्हाण यांच्याकडुन मे.नवकेतन फार्मा प्राईवेट लिमिटेंड कंपनीसाठी घेतला असुन ते या कंपनीचे डॉयरेक्टर आहेत. त्यांनी महावितरण तर्फे देण्यात आलेले जानेवारी २००६ पर्यतचे वीज बिल भरलेले आहे. महावितरणतर्फे फेब्रुवारी २००७ मध्ये त्यांना १६५१७ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आले.या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेता त्याचा कोणतीही पुर्व सुचना न देता जुन २००७ मध्ये वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. अर्जदाराने सतत पाठपुरावा केल्यानंतर दिनांक ०१/०८/२००८ रोजी मीटरची स्थळपाहणी करण्यात आली व त्यात वीज बिल चुकीचे असल्यामुळे ते दुरुस्त करुन देण्याबाबत शेरा लिहीण्यात आला असल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे.अर्जदाराने खंडीत केलेला वीज पुरवठा चालु करुन द्यावा तसेच सुधारीत वीज बिल देण्याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने पुर्वसुचना न देता खंडीत केलेला वीज पुरवठा चालु करुन देण्याबाबत केलेल्या विनंतीवर दिनांक २७/०१/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी अर्जदार श्री भागवत कराड व नारायण पाटील उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी मंचात दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदाराने वीज बिल न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा जुन २००७ मध्ये

खंडीत करण्यात आला असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे अर्जदाराकडे जुन २००८ पर्यंत १,१९,०००/-रुपये थकबाकी असुन जुन २००७ ते जानेवारी २००९ या काळात वीज पुरवठा खंडीत असल्याचे म्हटले आहे.तसेच बिल दुरुस्तीबाबतचा अहवाल छावणी उपविभागाकडुन आलेला नसल्यामुळे तो अहवाल पुढील सुनावणीच्यावेळी दाखल करण्यात येईल असे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे. मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेला जवाब व अर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे व सी.पी.एल.चे अवलोकन केल्यावर जुन२००७ पर्यंत वीज बिलाबाबत वाद नसल्याचे आढळुन आल्यामुळे त्यावेळी असलेली थकबाकी रक्कम रुपये ८५००/- भरल्यानंतर पुर्वसुचना न देता खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्याचा अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणीची तारीख ०३/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०३/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री पाटील व नोडल अधिकारी उपस्थित होते. त्यांनी अर्जदारास दिलेल्या वीज बिलात २०३०५.७७ रुपयाचे क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली. नोडल अधिकारी यांनी मंचाच्या आदेशानुसार अर्जदाराने रुपये ८५००/- रक्कम भरलेली असल्याने त्यांचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्यात आल्याचे म्हटले आहे.महावितरणतर्फे देण्यात आलेल्या वीज बिलावर अर्जदाराचे नांव नसुन त्यांनी ग्राहक असल्याचा कोणताही पुरावा मंचात दाखल केलेला नसल्याचे सांगितले. मंचाने अर्जदारास रजिस्टरी व इतर संबंधीत कागदपत्रे पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याचे आदेश देत सुनावणीची तारीख १०/०२/२००९ निश्चीत केली.

४) दिनांक १०/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराने मालमत्ता विकत घेतल्याबाबतची रजिस्टरी खरेदीखत इतर कागदपत्रे मंचात दाखल केली. अर्जदाराने महावितरण कंपनीच्या संबंधित विभागाकडे फेब्रुवारी २००७ मध्ये देण्यात आलेल्या १६५१७ युनीट वीज बिलाबाबत आजपर्यंत कोणतीही कार्यवाही

करण्यात आली नसल्याचे सांगितले. नोडल अधिकार यांनी अर्जदाराचे मीटर टेस्टींग करण्याची तयारी दर्शविल्यामुळे मंचाने मीटर चाचणी अहवाल दिनांक १८/०२/२००९ पर्यंत दाखल करण्याचे आदेश देत पुढील सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मीटर चाचणी अहवाल मंचात दाखल केला पण स्थळपाहणी अहवाल मंचात दाखल न केल्यामुळे तो ०३/०३/२००९ पर्यंत दाखल करण्याचा आदेश मंचाने दिला. अर्जदार यांनी त्याची मीटर बाबतची तक्रार ही फेब्रुवारी २००७ मध्ये केली असुन ती फक्त एका महीन्यात आलेल्या १६५१७ युनीट बिल वापराबाबत होती असे म्हटले आहे व दोन वर्षानंतर करण्यात आलेली मीटरची चाचणी मान्य नसल्याचे सांगितले.

६) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीदम्यान असे आढळुन येते की, अर्जदार यांनी सातारा औरंगाबाद येथील गट क्रमांक ११५ क्रमांकावर असलेली मालमत्ता भागवत लक्ष्मण चव्हाण यांच्याकडुन खरेदी केली असुन त्याचे अधिकृतपणे खरेदीखत करण्यात आले आहे. दिनांक २८/०१/२००५ रोजी अर्जदारास नवीन वीज पुरवठा करण्यात आला व त्यांना ९००६७३२०६६ या क्रमांकाचे मीटर बसविण्यात आले.दिनांक २८/०१/२००५ पासुन अर्जदाराने वाढीव वीज बिलाबाबत मंचात तक्रार दाखल करेपर्यंत त्यांना मीटर रिडींग प्रमाणे बिल आकारण्यात आले नसल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी किंवा छावणी विभागाचे उपकार्यकारी अभियंता हे याबाबत कोणताही खुलासा करु शकले नाहीत. मुख्य अभियंता औरंगाबाद परिमंडळ यांनी दिनांक ०८/०६/२००८ रोजी बिल दुरुस्ती प्रस्ताव मंजुर करतांना मीटर बदलण्याबाबत तसेच प्रदीर्घ काळापर्यत रिडींग न घेण्यात आल्यामुळे निर्माण झालेंल्या थकाबाकीची जवाबदारी निश्चीत करण्याबाबत महावितरणच्या संबंधित अधिका-याला

कळविले होते.पण त्यानंतरही अर्जदाराचे मीटर बदण्यात आले नसल्याचे व संबंधितावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसुन येते.नियमितपणे मीटर चे वाचन न करता ग्राहकांना सरासरीवर आधारीत वीज बिल देण्याच्या अनेक तक्रारी मंचासमोर आलेल्या आहेत.परंतु वीज पुरवठा दिलेल्या तारखेपासुन ते सहा वर्षापर्यंत एवढ्या प्रदिर्घ काळावधीपर्यत मीटर ची वाचन न करणे ही पहिलिच तक्रार मंचासमोर आली आहे.महावितरणच्या मीटर वाचन करण्याच्या एकुण प्रक्रीयेवरच प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

अर्जदाराने वरील मीटर असलेली मालमत्ता विकत घेतल्यानंतर त्यावेळी मीटरवर असलेली रिडींग तसेच जुन्या ग्राहकाच्या नांवे असलेले मीटर स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी कोणताही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे जुन्या वीज ग्राहकाची थकबाकी त्यांना भरणे बंधनकारक आहे.

नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेला कनिष्ठ अभियंता यांचा दिनांक १३/०७/२००७ रोजी चा स्थळ पाहणी अहवालावरुन मीटरवरील रिडींग २०५०५ अशी असल्याचे आढळुन येते.अर्जदाराचा वीज पुरवठा जुन २००७ ते जानेवारी २००९ या काळात थकबाकीमुळे खंडीत करण्यात आला होता.अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर मंचाने पारीत केलेल्या अंतरिम आदेशानुसार दिनांक २७/०१/२००९ रोजी जोडुन देण्यात आला त्यावेळी १११६७६९० या क्रमांकाचे नवीन मीटर बसविण्या आल्याचे आढळुन येते.

वरील सर्व निरीक्षणावरुन अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत दाखल केलेली तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेली मे २००१ पासुन ची सर्व वीज बिले रदद्‌ करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास २८/०५/२००१ ते जुन २००७ या ७३ महीन्याच्या काळावधीचे (२०५०५-०१)=२०५०४ युनिटचे बिल विभागुन द्यावे या बिलात कोणतेही व्याज व दंड आकारु नये.

३) महावितरण कंपनीने जुन २००७ ते जानेवारी २००९ या १९ महिन्याच्या कालावधीसाठी वीज पुरवठा खंडीत असल्याने फक्त स्थिर आकाराचे वीज बिल द्यावे.तसेच जानेवारी २००९ पासुन पुढील कालावधीसाठी नवीन मीटरवरील रिडींग प्रमाणे वीज बिल आकारावे.

४) महावितरण कंपनीने वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल अर्जदारास ३० दिवसांच्या आंत द्यावे व या वीज बिलात अर्जदाराने आतापर्यंत भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

५) महावितरण कंपनीने अर्जदारास मानसीक त्रासापोटी १५००/- रुपये ३० दिवसात द्यावेत.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.
गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७५/२००९/०९** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री भागवत कराड,**
**बंजाराहिल्स,बीड बाय पास रोड,**
**सातारा औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७५/२००९/०९ )

आपण दिनांक २३/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७५/२००९/०९** **दिनांक ;-**

**प्रति,**

**श्री भागवत कराड,**
**बंजाराहिल्स,बीड बाय पास रोड,**
**सातारा औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७५/२००९/०९ )

आपण दिनांक २३/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत

लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**